महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेसाठी (MRRDA) राज्यस्तरावर "वित्तीय नियंत्रक"या पदाच्या (Financial Controller) नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

शासन निर्णय क्रमांकः ग्रासयो २०११/प्र.क्र.१४२/बांध-१ (योजना-८)

बांधकाम भवन, ७ वा मजला, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई ४०० ००१.

दिनांक: २४ ऑक्टोबर, २०१७.

वाचा-

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रामविकास व जलसंधारण विभाग ग्रासयो-२००६/प्र.क्र.१३४/यो-९, दिनांक १६ मार्च, २००९.

२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रामविकास व जलसंधारण विभाग ग्रासयो/२०११/प्र.क्र.१४२/यो-८, दिनांक ३१ ऑगस्ट,२०१७.

३) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रामविकास व जलसंधारण विभाग ग्रासयो/२०११/प्र.क्र.५१/बांध-१ (योजना-८), दिनांक ०७ ऑक्टोबर,२०१७.

प्रस्तावनाः-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्रपणे अधिकारी / कर्मचारीवर्ग (Dedicated Staff) नियुक्त करावा असे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयाद्वारे पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये वित्तीय नियंत्रक (Financial Controller) या पदाचा समावेश आहे. योजनेच्या लेखा विषयक बाबींचा व्यवस्थापनासाठी वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून व Online Management Monitoring and Accounting System (OMMAS) च्या व्यवस्थापनासाठी वित्तीय नियंत्रक या पदाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. Operation Manual परि. २.२.६ प्रमाणे वित्तिय नियंत्रक या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, पुरेसे व्यावसायिक अनुभव व ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर पद करार तत्वावर नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. वित्तीय नियंत्रक पदाच्या भरती प्रक्रियेकरिता ज्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यांची निवड समितीमार्फत दि.१९.०९.२०१७ रोजी मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीमध्ये उमेदवारांना मिळालेले गुण तसेच त्यांच्या सनदी लेखापाल म्हणून कामाचा अनुभव विचारात

घेवून वित्तीय नियंत्रक या पदाकरिता श्री.सुनिल चिं. मोने यांची निवड करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने वित्तीय नियंत्रक या पदावर श्री.सुनिल मोने यांनी नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय-</u>

संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गतच्या १३८४ पदांना दि.३१ डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअनुषंगाने, वित्तीय नियंत्रक (Financial Controller) या पदासाठी शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व योजनेमधील कामाचा अनुभव लक्षात घेता श्री.सुनिल चि.मोने, सनदी लेखापाल यांची वित्तीय नियंत्रक (Financial Controller) या पदावर त्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने दि.०४. ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. वित्तीय नियंत्रक (Financial Controller) या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या Operation Manual मधील विहीत तरतुदीनुसार बंधकारक राहतील.

३. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना MRRDA या संस्थेकरीता हिशोबाची पुर्तता करुन केंद्र शासनास सादर करणे या करिता अंतर्गत हिशोब तपासनीस यांची नेमणूक करणे, वैधानिक लेखा परिक्षण करुन घेणे, संस्थेचे बॅकिंग व्यवहार सांभाळणे, संस्थेच्या वेगवेगळया सभांना उपस्थित राहणे व वित्तीय मार्गदर्शन करणे, MoRD व MRRDA या संस्थांशी संपर्क ठेऊन पत्रव्यवहार करणे व योजनेसाठी लागणा-या निधीची पुर्तता संबंधात प्रयत्न करणे, वित्तिय नियंत्रक या नात्याने OMMAS Online पध्दतीचे नियंत्रण करणे व इतर आवश्यक तेवढी कर्तव्ये पार पाडणे इ. जबाबदाऱ्या वित्तीय नियंत्रक यांच्या राहतील. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांचेमार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कामही प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेप्रमाणेच करण्याची जबाबदारी या वित्तीय नियंत्रकांची राहील.

४. श्री.सुनिल चि.मोने वित्तीय नियंत्रक यांचे दि.०४ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीकरिता मासिक एकत्रित मानधन पुढीलप्रमाणे राहील.

मानधन	रू. ३५,०००/-
प्रवासभत्ता (मुंबईसाठी)	रु. १५,०००/-
दूरध्वनी व इंटरनेट खर्च	रु. ६,०००/-
एकूण	रु. ५६,०००/-

* तसेच योजनेच्याकामी मुंबई बाहेरील येणारा प्रवासखर्च त्यांना देय राहील.

५. सदर पदावरील येणारा खर्च राज्यस्तर मागणी क्र.एल-४, ३४५१ सेक्रेटरिएट आर्थिक सेवा ०९०- सेक्रेटरिएट (०१) (०१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (३४५१००८२) या लेखाशिर्षाखाली यावर्षी मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२४१६४३५०६९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Nathlya Valvi

Digitally signed by Prakash Nathlya Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=37e23389b57a9e7ec7b19b76a580789713f16034880d23f1579f9f010c94459d, cn=Prakash Nathlya Valvi
Date: 2017.10.24 16:47:48 +05'30'

(प्रकाश वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / विधानसभा,
३. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
६. मुख्य अभियंता (प्रमंग्रासयो) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई
८. उपसचिव आस्थापना/अर्थसंकल्प, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई

९. राज्य गुणवत्ता समन्वयक (प्रमंग्रासयो), पुणे
१०. अधीक्षक अभियंता (प्रमंग्रासयो) (सर्व)
११. कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) (सर्व)
१२. वित्तीय नियंत्रक (प्रमंग्रासयो) मुंबई
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखाधिकारी, मुंबई
१५. श्री.सुनिल चि.मोने, सनदी लेखापाल वित्तीय नियंत्रक, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,७०१/बी, हेरीटेज प्लाझा, तेली गल्ली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००६८.
१६. आय.टी.नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.
१७. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थ-१७/वित्तीय सुधारणा-१/आ.पु.क.), मंत्रालय,मुंबई
१८. कार्यासन अधिकारी (आस्थापना-१/रोख शाखा/वित्त-१/योजना-९), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
१९. निवड नस्ती (बांधकाम-१), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई.